Historicity Research Journal
Volume 1 | Issue 6 | Feb 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

# श्रीकांत मोरे यांच्या साहित्याची समीक्षा

**प्रा. वामन जाधव**
मा.ह.माहडिक महाविद्यालय, मोडनिंब

मराठी साहित्य विपुल प्रमाणात लिहिले जात आहे. समाजातील अनेक प्रश्न साहित्याच्या केंद्रस्थानी येत आहेत. त्यातही गांभिर्याने साहित्य लेखन करणारे लेखक आपल्या सकस आणि दर्जेदार लेखनाने रसिक मनाचे लक्ष वेधून घेत आहेत. या लक्षवेधी साहित्यामध्ये श्रीकांत मोरे या नावाचा अग्रक्रमाने समावेश करावा लागेल. 'रंग भावलेले', 'भावसुमने', 'नवरस', 'संवेदना', 'आई', 'आई माझी शाळा', 'हातोडा', 'मुक्तविहार', 'प्रवाह', 'निसर्ग', 'पाझर', 'शतःदा प्रेम करावे' इ. (कवितासंग्रह), विचारधारा (वैचारिक लेखसंग्रह), शोध अंर्तमनाचा, अंर्तमन (कथासंग्रह), चिंतन, मनात शिरताना (ललित संग्रह) असे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. समीक्षकांनी साहित्य रसिक वाचकांनी त्यांच्या साहित्याची दखल घेतली आहे. महाराष्ट्रातल्या प्रतिष्ठित अशा अनेक साहित्य पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे. अनेक व्याख्यानातून, साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून त्यांनी साहित्याविषयी आपली भूमिका मांडली आहे. तरीही अभ्यासक आस्वादकाकडून तटस्थ आणि मुलगामी चर्चा त्यांच्या साहित्यावर व्हावी ती चर्चा मराठी साहित्य रसिकापुढे ठेवावी या हेतूने हे लेखन झाले आहे.

श्रीकांत मोरे यांचे काव्यलेखन लक्षणीय आहे. विविध अंगाने त्यांचे काव्य संपन्न समृद्ध आहे. अनेक मान्यवर समीक्षकांच्या प्रस्तावना त्यांच्या कविता संग्रहाला लाभल्या आहेत. 'मुक्तविहार'–द. ता. भोसले, 'निसर्ग'–गो. मा. पवार, 'हातोडा'–डॉ. राजशेखर शिंदे, 'नवरस', 'संवेदना'–डॉ. सुहास पुजारी, 'आई', 'आई माझी शाळा'–राजेंद्र दास, 'भावसुमने'–उत्तम इर्लेकर, 'पाझर'–डॉ.नसीमा पठाण, 'प्रवाह'–माधव कुलकर्णी अशा मान्यवरांच्या प्रस्तावना त्यांच्या कविता संग्रहाला आहेत. शिवाय डॉ. सौ. श्रुतीश्री वडकबाळकर, प्रा. सौ. अनुषा मांढरे, सौ. अस्मिता सुरेश गायकवाड, प्रा. सौ. मोहिनी पत्की, सुनेत्रा पंडित इ. समीक्षकाचे चिंतन मोरे यांच्या कवितेविषयी प्रकट झाले आहे. दत्ता हलसगीकर, निर्मलकुमार फडकुले यानी त्यांच्या साहित्यावर मौलिक विचार मांडले आहेत.

एकूणच त्यांच्या कविताचा संदर्भ आणि व्याप्ती समीक्षकांनी दाखवून दिली आहे. एखाद्या कवीचा अभ्यास करताना अभ्यासकाला फार कसरत करावी लागते. त्या कवीचे योग्यते मुल्यमापन झाले पाहिजे, अशी अभ्यासकांची धारणा असते. शिवाय कवी म्हणून कवीच्या व्यक्तिमत्वाचा वेधही अभ्यासकांना घ्यावा लागतो. कवी म्हणून श्रीकांत मोरे यांच्या व्यक्तीमत्वाचे पैलू 'मुक्तविहार' या कविता संग्रहाच्या प्रस्तावनेत प्रसिद्ध समीक्षक डॉ. द. ता. भोसले यांनी उलगडून दाखविले आहेत. ते म्हणतात, कविचे व्यक्तीमत्व सजग आहे. संवेदनशील आहे. सौंदर्य दृष्टीची एक वेगळी जाण कविता वाचताना जाणवते. त्यामुळेच कविता त्यांना कमरमणुकीचा सोपा मार्ग वाटत नाही. कविला कविता म्हणजे आयुष्याला समृद्ध करणारे व्रत वाटते. सौंदर्याची साधना, शब्दाची उपासना, अनुभवाची समृद्धी आणि उच्चतम आनंद लाभणारा प्रसाद म्हणजे कविता वाटते. त्यामुळे या कवीच्या व्यक्तीमत्वाला व्यामिश्रता प्राप्त झालेली आहे. मोरे यांच्या कवितेची प्रवृत्ती समाजशील आहे. सामान्यांच्या जगण्याचा अर्थ शोधणारी आहे. माणसातला माणूस शोधण्याचा ध्यास

त्यांच्या कवितेला लागला आहे. समाज आता माणसापेक्षा माणुसकीला भुकेला आहे. ती भूक भागविण्याचे काम मोरे यांची कविता करते. खराखुरा माणूस आपणाला भेटेल का? अशी हाक त्यांची कविता देते. अवतीभोवती काळाकुट्ट अंधार दाटलेला असला तरी आपली कविता पणती सारखा इवलासा प्रकाश देण्याचे काम करेल असा आशावाद कविला आहे. म्हणूनच जीवनाबद्दलची जाणीव त्याची कविता प्रकट करते. अस्वस्थता आणि चैतन्य दायित्व मोरे यांची कविता साकारत जाते. परंतु मोरे यांची कविता अस्वस्थेतून निराश होत नाही तर ती कमालीची आशावादी आहे. कवीचा हा आशावाद डॉ. द. ता. भोसले यांनी अधोरेखित केला आहे. मोरे यांची कविता उदासीन, हताश आणि निष्क्रीय माणसाला प्रोत्साहन देणारी कविता आहे. एका ध्येयवादी, आशावादी आणि आचार–विचार संपन्न अशा व्यक्तीमत्वाने रसिकांशी केलेला संवाद त्यांच्या कवितेत महत्त्वाचा वाटतो. त्यांच्या कवितेतील आशयाची संपन्नता, अभिव्यक्तीतील नाविन्यता आणि आकृती बंधातील एकात्मता त्यांच्या आगळ्या वेगळ्या प्रतिभेतून घडत गेलेली दिसून येते. आपल्या विचारधारेची चिंतनाची प्राणपणाने जपणूक करणारा हा कवी जितका डोळस आहे. तितकाच भावनाशील आहे. तसा संवेदनशील आहे. तत्त्वनिष्ठ, ध्येयनिष्ठ आणि मानवी मुल्याचा आग्रह धरणाऱ्या या कविला आपल्या जन्मभूमीबद्दल जेवढे प्रेम आहे. तेवढेच राष्ट्रावर आहे. राष्ट्रातील जातीधर्म निरपेक्ष ऐक्यावर, एकात्मतेवर आहे. कविला जेवढा देशातील विविधतेचा राष्ट्रीय अस्मीतेचा अभिमान आहे. तेवढाच निसर्गाबद्दल आहे. निसर्गाकडे पाहण्याची कविची दृष्टी जशी सौंदर्याची आहे. तशी विवेकाची ही आहे. कवीचे संवेदनशील मन दऱ्याखोऱ्याचे, झाडा–झुडपाचे, ऊन–पावसाचे, फुला–फळाचे, पशु–पक्षाचे, झऱ्याचे, नानाविध रंगाचे गंधाचे असे अनेक घटक टिपते. पण निसर्गाकडून आपणास खूप काही शिकण्यासारखे आहे. असे कविने आग्रहाने सांगितले आहे. निसर्ग शिक्षक असतो, मार्गदर्शक असतो. तो पानगळीवेळी दुःखाश्रू ढाळत नाही. नव्या पालविच्या श्रीमंतीने हुरळूनही जात नाही. साधु–संतासारखे सुख दुःखांच्या पलिकडे निसर्ग अलौकिक पातळीवर आहे. झाड लावणाऱ्याला व तोडणाऱ्यालाही आधार देते. निसर्गच माणसाला माणूसपण देतो. देवपण देतो. निसर्गातील प्रत्येक हालचाल काहीतरी माणसाला संदेश देत असते. सागर विशालतेचा नव्या प्रगतीचा आदर्श देतो. निसर्गाकडे पाहण्याची ही दृष्टी कवीची वेगळेपणाची आहे. निसर्गाच्या माध्यमातून निसर्गाच्या प्रतिका–प्रतिमाद्वारे निसर्गाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी लिहिलेली कविता बालकवीच्या निरागस अशा फुलराणी या कवितेची आठवण करून देणारी आहे. वासना रहित शुद्ध प्रेम भावनेने ते प्रेम पात्राकडे पाहतात.

'' झाडा झाडाला कपडे मोकळे लटकतात
निसर्गाशी एकरूप होतात
हलकेच पाण्यात तरंग उठतात
पाण्यावर लाटा उठतात!''

निसर्गाच्या पार्श्वभूमिवर फुललेली ही प्रेम भावना कविनी अतिशय संवेदनशील तितकीच तरलतेने आणि काव्यात्मरितीने व्यक्त केली आहे. त्यांची विशुद्ध प्रेमभावना रिमझिम या कवितेत व्यक्त झाली आहे.

''काळ्याभोर लांब केसातून ठिबकतो पाऊस
बटातून गालावर थांबतो पाऊस
थांबतो कधी नयनांवर
थांबतो कधी ओठावर''

त्यांच्या निसर्ग आणि प्रेमविषयक कवितेविषयी डॉ. द. ता. भोसले यानी केलेले विवेचन खूप महत्त्वाचे आहे. जलतत्त्व, भूतत्त्व, तेजतत्त्व आणि आत्मतत्त्व याचा सुरेख संगम या निसर्ग कवितेत झाला आहे. त्याला प्रेम तत्त्वाची जोड

दिल्याने निसर्गरूप आणि देहरूप यांचाही संगम या ठिकाणी पहावयास मिळतो. श्रीकांत मोरे यांनी आई विषयी आपल्या भावना कवितेत व्यक्त केल्या आहेत, जीवनाला उन्नत आणि श्रीमंत करणाऱ्या चिरंतन संस्काराचे एकमेव विधान म्हणजे आई ही भूमिका कविने आपल्या कवितेत अधोरेखित केली आहे. आईची भाषा स्पर्शाची असते, जगाच्या इतिहासामध्ये आईची अंगाई अजरामर झाली आहे. दया, प्रेम, करूणा, अहिंसा, शांती, वात्सल्य यांची शिकवण आईकडून मिळते. आई निरक्षर असली तरी तिला त्रिकाळाचे ज्ञान असते, आईच्या प्रेमाला रंग नसतो, जात नसते, धर्म नसतो, ते प्रेम कुठेही विकत मिळत नाही. आईची ही महती अनेक कविंनी सांगितली आहे. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या प्रतिमा वापरल्या आहेत. आई म्हणजे, सूर्याचे प्रतिबिंब, शहाळाचं पाणी, चुलीतला जाळं, खड्गाची धार, पानावरील दव, मोकळे आकाश, आकाशाचा खांब, लंगड्याचा पाय, समईतली वात, दुधावरची साय, हिरवी गर्द अंबराई, चंद्राची शितलता अशा अनेक प्रतिमा वापरून आईविषयी आपल्या भावना प्रतिभावंतांनी व्यक्त केल्या आहेत. श्रीकांत मोरे यानी आईविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

''हसलो..... रडलो....
सुख दुःखाला आईच होती.
ह्रदयाच्या गाभाऱ्यात, मूर्ती सजीव
सदा आशीर्वाद देणारी
कोणीच नव्हते आई होती तेव्हा!''

आई आपणाला शिकवते लहानाचा मोठा करते. गणपती बाळाला बुद्धी देतो. सरस्वतीला विद्या देते. आईने तिच्या जन्मापासून मिळवलेले विश्वाचे सारे ज्ञान तिच्या लेकरासाठी असते. तिला फक्त देणे माहित असते. आयुष्यभर हा देण्याचाच यज्ञ ती सुरू ठेवते आणि एके दिवशी त्यातच तिचीही आहुती पडते. पण तिला यातच 'कृतर्थता' वाटते असा मोरे यांचा विचार प्रा. डॉ. राजेंद्र दास अधोरेखित करतात. कवीसाठी 'आई' म्हणजे एक पोथीतला पवित्र असा शब्द त्या पावित्र्यामागची प्रचंड शक्ती हीच जगाची ऊर्जा आहे. याचा प्रत्यय कवीची कविता वाचताना येतो. जीवनाला उन्नत आणि श्रीमंत करणाऱ्या चिरंतन संस्काराचे एकमेव विधान म्हणजे आई ही आई विषयक भूमिका त्यांच्या कवितेतून दिसून येते.

''आईच्या सावलीत विश्व भासते
आईच्या साथीत जीवन सामावते
सारं कसे सर्वव्यापी आईच असते
न उलगडलेले कोडे आई सोबत करते''

आईची आठवण ही किती आश्वासक आहे. याचा प्रत्यय त्यांच्या कवितेतून दिसून येतो. साऱ्या सृष्टीत कवी आईचे रूप पाहतो. गाईच्या हंबरण्यानेही तो व्याकूळ होतो. कवीच्या कवितेतील अईचे रूप विलोभनीय आहे. ह्रदयाला भिडणारे आहे. डॉ. द. ता. भोसले याना श्रीकांत मोरे यांची कविता म्हणजे मातृभक्ताने गायलेले मंगलस्त्रोत वाटते.

'नवरस' हा वेगळ्या वळणाचा कवितासंग्रह कविनी लिहिला आहे. खरे तर याला कवितासंग्रह म्हणण्याऐवजी लावणीसंग्रह म्हणणे योग्य ठरेल. यात रतिभाव व्यक्त करणाऱ्या कविता आहेत. तरूणाईने ओतप्रोत भरलेल्या प्रणयिनीची विविधरूपं 'नवरस' या कवितासंग्रहात पाहावयास मिळतात. लावण्य म्हणजे सौंदर्य लवण म्हणजे सुंदर लावण्य सौंदर्य या प्रमाणे स्त्री सौंदर्य वर्णनपर काव्य म्हणजे लावणी अशी लावणीची व्याख्या केली जाते. 'नवरस' या संग्रहातील बऱ्याच कविता स्त्री सौंदर्य वर्णनपर आहेत. उत्कट शृंगार हा लावणीचा प्राण असतो. शृंगाराने रात्र सजते तेव्हाच बहरलेल्या रंग महालात घुगरं बोलू लागतात. त्याचा हळुवार सूर रसिक काळजीन काळजाला बांधून ठेवतो. घुंगराच्या नादान अंग अंग

बोलू लागतं तेव्हां उभार पेटत्या देहाची अंतरिक भूक जागी होते. तिचे थैमान नाजूक देहाला पेलवत नाही. तेव्हा तिच्या मनातील भाव कविनी टिपला आहे.

''माझा डाव रंगु द्या
तुमचा विडा रंगु द्या
धुंदीत मला येऊ द्या
तुम्हच्या डोहांमध्ये बुडू द्या
खोलवर तनमन बघु द्या.''

पण तीचा डाव अर्ध्यावर मोडला जातो. तिचे स्वप्न वास्तवात खरे ठरत नाही. सावली सारखी बरोबर असणारी पोटी-पाटीची वेदना ती पदराआड झाकून रोज नव्याने देहाची आरास मांडते आणि आरशासमोर उभी राहते. देखण्या देहाचा तिलाच मोह होतो. तीला वाटत आपणाला कोणीतरी घरपण देईल ती म्हणते,

''सारे आसमंत चांदण्याचे खेळ पाहण्यात रंगले
मी तापले शीतल चंद्राने तू असा मावळलास का? रे.''

तिच्या मनातील हे गुपीतती घुंगराशी बोलत राहते. आभाळभर हात पसरून रसिकासाठी करूणा भाकणारी घुंगर बोलत राहतात तिच्याशी. तेव्हा रातराणी सारखी ती पुन्हापुन्हा उमलत राहते. दुःखाला पायाखाली घेते. पण मन मोहरून सुद्धा जीर्ण झालेलं शरीर साद देत नाही. तेव्हा जन्मभर सख्या सोबतीनं असणारी घुंगर अबोल होतात तेव्हा जगण्याची नवी शोकांतिका सुरू होते. तेव्हा ती म्हणते,

''असो सौंदर्य लावण्यवती म्हणूनी सारे सहन केले.
कीतीही मनाला समजावले, तरी ओरखडे कुळासाठी घेतले.''

असा स्त्रीच्या उत्कट भावनेचा आविष्कार 'नवरस' या लावणी संग्रहात व्यक्त झाला आहे. प्रासादिक भाषा, बाह्य शृंगार वर्णना बरोबरच मनोभावनेला कविने अधिक प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सोलापूर कवितेत या लावण्या लक्षणीय ठरतील असा आशावाद डॉ. सुहास पुजारी यांनी व्यक्त केला आहे, तो योग्य असा आहे. लावणीमध्ये नाजूक शब्दकळा महत्त्वाची असते पण अशा नाजूक शब्दाचा मोह होण्यासाठी रसिकता लागते ती रसिकता श्रीकांत मोरे यांच्याकडे आहे.

एकूणच श्रीकांत मोरे यांच्या कवितेला स्वतःच रंगरूप आहे. चेहरा मोहरा आहे. कुठल्याही कविचा प्रभाव व कोणत्याही कविच्या कवितेच्या अनुकरणाची छाप त्यांच्या कवितेतून जाणवत नाही. समाजजीवनावर भाष्य करित ती उलगडत जाते. अशा वेळी ती आक्रोश करित नाही. उरबडवेपणाही तीला भावत नाही. ती विचारावर उभी राहून उत्त्कटपणानं ती साकारत जाते. वर्तमानाला मुखरीत जाते. माणसाच्या माणूसपणाला ती साद घालते. मोरे यांची कविता आशय, अभिव्यक्ती, रचना या सर्वच घटकाबाबत ती संपन्न आहे. तितकीच भाषाशैलीच्या बाबतीत साधी सोपी आहे. ती कुठेही दुर्बोध वाटत नाही. साधी सोपी आणि प्रवाही भाषाच मोरे यांच्या कवितेला अर्थगर्भ बनवते. किंबहूना कवितेचा साधेपणाच कवितेची श्रीमंती वाढवताना दिसतो.

'शोध अंतर्मनाचा' आणि 'अंतर्मन' असे दोन कथासंग्रह श्रीकांत मोरे यांचे प्रसिद्ध आहेत. 'शोध अंतर्मनाचा' या कथासंग्रहाला प्रसिद्ध समीक्षक डॉ. द. ता. भोसले यांची प्रस्तावना आहे. भारत सासणे यांचा अभिप्राय आहे. तर अंतर्मन

या कथासंग्रहाला प्रा. डॉ. राजशेखर शिंदे यांची प्रस्तावना लाभली आहे. उपजत प्रतिमा, संवेदनशील मनोवृत्ती, सुक्ष्म निरीक्षण शक्ती आणि जातिवंत भाषाप्रेम श्रीकांत मोरे यांच्या ठायी असल्याने त्यांच्या दोन्ही कथासंग्रहातील कथा वाचनिय झाल्या आहेत. समृद्ध व्यक्तीमत्व आणि संवेदनशील मन असल्याशिवाय लेखकाच्या कथेत विषयाची विविधता नि संपन्नता येवू शकत नाही. श्रीकांत मोरे यानी संवेदनशील मनाने आजुबाजूचे समाज वास्तव शब्दबद्ध केले आहे. त्यामुळेच त्यांच्या कथांना विविधता प्राप्त झाली आहे. शेतकरी, शेतमजूर, दलित, पिढीत, शोषीत असे गावगाड्यातील व गावगाड्याबाहेरील अनेक घटक त्यांच्या कथेच्या केंद्रस्थानी आले आहेत. खेड्यातील दैन्य, दारिद्र्य, भूक, उपासमार, अज्ञान, अंधश्रद्धा यांचे वास्तव चित्रण लेखकाने केले आहे. मोरे यांची कथा वाचल्यावर वाचक अस्वस्थ होतो. विचार करायला लागतो. हे श्रीकांत मोरे यांच्या कथेचे यश आहे. श्रीकांत मोरे यांच्या कथा नायिका प्रधान आहेत. स्त्रीयांच्या भावभावनाचा आविष्कार त्याच्या कथेत व्यक्त झाला आहे. भारतीय स्त्रीच्या तळहातावर देशाची संस्कृती उभी आहे. तिच्या श्रमातूनच शेत शिवार फुलले आहे. जगाला येणारे अन्न तिच्या श्रमातून येते. देशाला जगविण्याचे सामर्थ्य तिच्या मनगटात आहे. श्रम, सहनशीलता, प्रेम, समर्पण, वात्सल्य, चारित्र्य, अशी स्त्री जीवनाची वैशिष्ट्ये त्याच्या कथेत शब्दबद्ध झाली आहेत. लेखकाने स्त्रीकडे कारूण्याच्या नजरेने पाहिले आहे. सहानुभूतीच्या नजरेने पाहिले आहे. त्यामुळे मानवतावादी दृष्टीकोन त्यांच्या कथेत दिसून येतो. त्यांच्या कथेतील स्त्री पात्रे वाचकाच्या दीर्घकाळ लक्षात राहतात. आईला विसरलेल्या पोराचा शेवटचा स्पर्श नाकारण्याचा करारीपणा दाखविणारी राधा, सावकाराने दाखविलेल्या प्रलोभनाला ठोकरून दारिद्र्याची श्रीमंती भोगणारी चारित्र्यशील नी बाणेदार शालन अशी स्त्री पात्रे वाचकाच्या मनावर खोलवर संस्कार करून जातात. मोरे यांच्या कथा लघुत्तम म्हणजे आकाराने खूप लहान असल्यातरी आशयाच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या आहेत. तसे पाहता हा लघुत्तम कथा प्रकार त्यानी यशस्वी करून दाखविला आहे, असे डॉ. द. ता. भोसले याना वाटते. या लघुत्तम कथेत लेखकाने भाषेचा केलेलावापर मनोज्ञ आहे. भाववृत्तीला आधार देण्याच्या संदर्भात ही भाषा गुण संपन्न वाटते.

'विचारधारा'हा श्रीकांत मोरे यांचा वैचारिक संग्रह आहे. भास्कर चंदनशीव यांची या ग्रंथाला प्रस्तावना आहे. एका ध्येयवादी आशावादी आचार–विचार संपन्न अशा व्यक्तीमत्वाने वाचकाशी केलेला हा संवाद आहे. कविता, लेख, मनोगत काहीही असो यामध्ये एकदा पेन कागदावर टेकवले की मग भराभर विचाराचे लोट येत राहतात. आणि मग शेवटच आपल्या लेखनाविषयी लेखकाने मनोगतात म्हटले आहे. याचा अर्थ लेखकाने मुक्तपणे हा संवाद केला आहे. त्यामुळेच हा संवाद आत्मिक स्वरूपाचा वाटतो. तव्याला भाकरीचा भ्रम पडावा असे खेडे, पाण्यासारखं पाणी नासवणारा धर्म, वाढत जाणारे जातीचे कळप, शेतकऱ्याच्या आत्महत्या, वाढती बेकारी, कधी नाही येवढी मुल्य व्यवस्थेची झालेली पडझड अशा दूरवर पसरलेल्या अंधारात खूप मोठ्या निष्ठेने जीवनमुल्याचा आग्रह धरून श्रीकांत मोरे काही विचार अधोरेखित करित आहे. माणूसपण, मातृत्व, निष्ठा, त्याग, सत्य, संवेदनशीलता लेखकाला महत्त्वाची वाटते. निर्मळ आनंदी जीवनजगण्यासाठी मानसाकडे कठोर साधना असायला हवी असा एक विचार त्यानी एका लेखात मांडला आहे. मूर्तीकार मूर्ती घडवताना एकाग्रतेने मूर्तीचे एकएक पापुद्रे काढतो. आपण पाहत असतो. त्याचा नाजूक घाव हातोडा छन्नी दगडावर काहीतरी आघात करित असते. त्याचे नेकमे लक्ष समोर असते. मनात मूर्तीची प्रतिमा असते. मनातली प्रतिमा जर हातातल्या ठोक्यातून साकारत असेल तर ते मोठे आश्चर्य नाही का? त्यासाठी साधना हवी. मूर्तीकाराप्रमाणे जीवन यशस्वी करण्याचे चित्र मनात कोरले पाहिजे असा विचार लेखक मांडतात. निसर्ग, मर्यादा, बदल, क्षमा, कठिण, अनुभव या लेखातून सुखी जीवनासाठी लेखकानी काही मौलिक विचार मांडला आहे. मित्राला सल्ला द्यावा असा सहजपणे त्यानी हा विचार सांगितला आहे. पण त्यांचा हा मित्रसल्ला मुल्य भावनेला जागृत करणारा आहे. शैलीचा निर्भेळ, नितळ आणि पारदर्शीपणा राखून लेखक वाचकांशी संवाद करित राहतात. या संवादाच्या मुळाशी माणसाला माणूसपण देण्याचा विचार आहे. या संवादातून लेखक, सत्य, शिव, सौंदर्याचा स्वीकार करतो तर असत्याचा, अनितीचा, कौरूप्याचा, कौर्याचा निषेध ही करतो.

श्रीकांत मोरे यांचे 'चिंतन' आणि 'मनात शिरताना' असे दोन ललित संग्रह आहेत. या दोन्ही ललित संग्रहाला प्रसिद्ध साहित्यीक समीक्षक डॉ. द. ता. भोसले यांची प्रस्तावना आहे. लेखकाचे ललित लेखन अनेक अर्थाने महत्त्वाचे आहे. आपणाकडे आध्यात्मिक स्वरूपाच्या धर्म चिंतनाला मोठी परंपरा आहे. परंतु लेखकाचे चिंतन हे समकालीन समाज जीवनावरचे चिंतन आहे. या चिंतनाद्वारे जीवनातील काही पैलूचे मनोज्ञ आणि प्रासादिक दर्शन लेखकाने घडविले आहे. चिंता मनाला अस्वस्थ करते, असमाधानी बनवते. आपल्या जीवनाला व्यापून राहते. व्यवहारिक बाबीमध्ये गुंतवून टाकते. तर चिंतन आत्मशोध आणि आत्मप्रत्यय आणून देणारे असते. चिंतन आपणाला अंतर्मुख बनवित असल्याने आपणाला पदोपदी पडणाऱ्या साऱ्या प्रश्नाची उत्तरे या चिंतनातून आपणाला प्राप्त होत असतात. चिंतनाने माणसातला माणूस जागा होतो त्याला देवत्व प्राप्त होते. असा निष्कर्ष लेखकाने या ग्रंथात काढला आहे. या चिंतनाचा समाजाशी असणारा संबंध लेखकाने स्पष्ट केला आहे. चिंतनाने माणूस संयमी झाला की, विचारी होतो. तो उदात्त बनतो. हे उदात्तीकरण जीवनाला परिपूर्ण बनवते. असे लेखकाला वाटते. लेखकाने हे केलेले विवेचन साध्या सोप्या प्रासादिक भाषेत केले आहे. त्यासाठी संत महात्म्याची उदाहरणे दिली आहेत. समाजातील दैन्य, दारिद्र्य, भूक, उपासमार, गांजलेपण, शोषण, अनिष्ठ रूढी, परंपरा, दांभीकता, नात्यातील कोरडेपणा, स्त्री देहाची विटंबना, बेकारी, शेतकऱ्याच्या आत्महत्या, स्पृश्यास्पृश्यता, दंगली, जाळपोळ, भ्रष्टाचार आदिचे माजलेले स्तोम हे लेखकाच्या संवेदनशील मनाला अस्वस्थ करते. स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता, राष्ट्रभक्ती, अशी नवी समाज रचना लेखकाला हवी आहे. त्यासाठी माणसाच्या मनाची शिल्प लेखकाला घडवायची आहेत. त्यासाठी हे चिंतन आहे. मनात शिरताना या ललित संग्रहातील लेख जीवन चिंतनाच्या दृष्टीने मौलिक आहेत. समाजाचे बदलते आदर्श, बदललेली जीवनमुल्ये, सुखाच्या बदलत जाणाऱ्या धारणा, यातून माणसाला येणारे नैराश्य, हरवत चाललेले सुख त्यातून हरवत चाललेले माणूसपण, यावर लेखकाने केलेले भाष्य खऱ्या अर्थाने समाजाची गरज आहे.त्यांच्या प्रत्येक लेखनातून त्यानी माणूसपणाचा शोध घेतला आहे. मनाच्या निमित्ताने मानवी जीवनाचे सर्वस्पर्शी असे चिंतन लेखकाने व्यक्त केले आहे. लेखकाचे चिंतन जसे मनाचे दर्शन घडविते. तसे जीवनाचे ही दर्शन घडविते. त्यांच्या या चिंतनाने वाचकाची जीवन विषयक जाणीव प्रगल्भ होते. हे या ललित संग्रहाचे बलस्थान आहे.

कविता, कथा, वैचारिक लेखन, ललितलेखन या सर्वच क्षेत्रात श्रीकांत मोरे यानी आपल्या कसदार लेखनीने साहित्य विश्वात एक वेगळी प्रतिमा निर्माण केली आहे. अभ्यासकानी त्यांच्या ग्रंथांचा परिचय करून दिला आहे. आस्वादक भूमिकेतून त्यानी समीक्षा केली आहे. अभ्यासकाला जाणवलेली ग्रंथाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. सौंदर्य लक्षी कवी मन, डोळसश्रद्धा, निकोप रसिकता, बहुमतता, जिज्ञासा, संवेदनशीलता असे कवीचे व्यक्तीमत्व अभ्यासकाने उलगडून दाखविले आहे.

### संदर्भग्रंथ

१) मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, कैलास सार्वेकर, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे.
२) ग्रामीण साहित्य प्रवाह आणि परिस्थिती, वामन जाधव, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.